आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
१७ एप्रिल २०२५ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- वक्फ सुधारणा कायद्यातल्या काही तरतुदींची अंमलबजावणी प्रलंबित ठेवण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे आदेश

- सर्वोच्च न्यायालय राष्ट्रपतींना निर्देश देऊ शकत नसल्याचं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांचं मत

- संपत्ती निर्मितीचं दीर्घकालीन उद्दिष्ट ठेवण्याचा केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचा गुंतवणूकदारांना सल्ला

**आणि**

- देशातल्या शेअर बाजारात सलग चौथ्या दिवशी तेजी

**<><><><><>**

वक्फ सुधारणा कायद्यातल्या तरतुदींनुसार वक्फ बोर्ड आणि केंद्रीय वक्फ कौन्सिलवर कोणतीही नियुक्ती केली जाणार नाही, असा हंगामी आदेश सर्वोच्च न्यायालयानं आज दिला. केंद्र सरकारतर्फे सॉलिस्टिर जनरल तुषार मेहता यांनी न्यायालयाला तशी हमी दिली. वक्फ सुधारणा कायद्याला आव्हान देणाऱ्या याचिकांवर केंद्र सरकारनं सात दिवसात उत्तर सादर करावं, असे निर्देश न्यायालयानं दिले. अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून...

**होल्ड व्हाइस कास्ट**

*राज्य वक्फ मंडळ आणि केंद्रीय वक्फ परिषदेवर मुस्लिमेतर व्यक्तींची नियुक्ती करणार नाही, तसंच केवळ वहिवाटीनं आहेत म्हणून, कोणत्याही, अधिसूचनेद्वारे किंवा राजपत्राद्वारे घोषित वक्फ मालमत्ता पुढच्या सुनावणीपर्यंत बेदखल केल्या जाणार नाहीत, असं सरकारनं आजच्या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाला*

*सांगितलं. पुढची सुनावणी ५ मे ला होईल, ही सुनावणी फक्त प्राथमिक हरकती आणि हंगामी आदेशासाठीच्या निर्देशाकरता होईल, असं सरन्यायाधीश न्यायमूर्ती संजीव खन्ना यांनी स्पष्ट केलं. १९९५ च्या वक्फ कायद्याला आणि २०13 च्या दुरुस्तीला आव्हान देणाऱ्या याचिका स्वतंत्रपणे वेगळ्या यादीत दाखवाव्यात, २०13 च्या दुरुस्तीला आव्हान देणाऱ्या याचिकाकर्त्यांना विशेष बाब म्हणून त्यांचे प्रतिसाद सादर करायला अनुमती असून, केंद्र आणि राज्यं, तसंच वक्फ मंडळंही प्रतिसाद सादर करु शकतात, असं न्यायालयानं सांगितलं. त्यासाठी ७ दिवसांची मुदत दिली आहे. याचिकांची संख्या मोठी असल्यानं याचिकाकर्त्यांनी सुनावणीसाठी त्यापैकी ५ याचिका निश्चित कराव्यात, असं न्यायालयानं सांगितलं.*

*सर्वोच्च न्यायालयाच्या हंगामी आदेशामुळे केंद्र सरकार आणि वक्फ बोर्ड दोघांनाही न्यायालयासमोर भक्कमपणे बाजू मांडण्याची संधी उपलब्ध झाली आहे, असं उपमुख्यमंत्री अजीत पवार यांनी म्हटलं आहे. सर्वोच्च न्यायालयानं दिलेली स्थगिती ही कुठल्या एका बाजूचा विजय किंवा दुसऱ्या बाजूचा पराजय नसून, भारतीय राज्यघटनेतल्या तरतुदींचं काटेकोर पालन व्हावं, यासाठी सर्वोच्च न्यायालयानं घेतलेली काळजी आहे, असं त्यांनी म्हटलंय. काँग्रेस कार्यकारिणीचे सदस्य नसीम खान यांनी न्यायालयाच्या आदेशाचं स्वागत केलं आहे. नवा वक्फ कायदा रद्द करावा, अशी मागणीही त्यांनी केली आहे.*

*दरम्यान दाऊदी बोहरा समाजाच्या एका शिष्ट मंडळानं आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची भेट घेऊन वक्फ सुधारणा कायद्याबद्दल त्यांचे आभार मानले.*

**<><><><><>**

विधेयकांवर निर्णय घेण्यासाठी राष्ट्रपतींना कालमर्यादा निश्चित करण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या अलिकडच्या निकालावर उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आहे. भारताच्या राष्ट्रपतींना न्यायालय निर्देश देऊ शकत नाही. न्यायालय फक्त घटनेचा अर्थ लावू शकतं, आणि त्यासाठी ५ सदस्यीय

घटनापीठ हवं असं ते म्हणाले. न्यायाधीशांनी कायदे ठरवावे, सरकारची कामं पार पडावीत, आणि परम संसद म्हणून काम करावं अशी लोकशाही भारताला अपेक्षित नव्हती, असं ते म्हणाले. ते आज राज्यसभेतल्या आंतरवासितांच्या सहाव्या तुकडीला संबोधित करत होते. अधिकारांच्या विभाजनाच्या तत्वावर भर देत, ते म्हणाले की, अधिकारांचा वापर करताना अत्यंत संवेदनशीलता बाळगली पाहिजे. कायदेमंडळं, न्यायपालिका, आणि कार्यकारी मंडळं या तिन्ही संस्था बहरण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली.

**<><><><><>**

यमुना नदीत सोडलं जाणाऱ्या सांडपाण्याचं प्रमाण आणि ते सोडण्याच्या आधी त्यावर शुद्धीकरण प्रक्रिया केली जात आहे कि नाही याची प्रत्यक्ष तपासणी आवश्यक आहे असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. यमुना नदीची सद्यपरिस्थिती आणि तिच्या पुनरुज्जीवनासाठी आखलेल्या योजनांचा आढावा घेण्यासाठीची बैठक आज नवी दिल्लीत मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झाली, त्यावेळी ते बोलत होते.

**<><><><><>**

केंद्रीय जलशक्ती मंत्री सी आर पाटील यांनी आज नवी दिल्लीत गोड पाण्यातल्या जैववैविध्यतेच्या संरक्षणाला प्रोत्साहन देणाऱ्या डिजीटल व्यासपीठाचा आरंभ केला. या माध्यमातून गंगा, कावेरी आणि गोदावरी सारख्या प्रमुख नद्यांच्या भौगोलिक संरचना, जैव विविधता आणि सार्वजनिक सहभागातून सुरू असलेल्या विविध प्रकल्पांची माहिती मिळणार आहे. राष्ट्रीय स्वच्छ गंगा प्रकल्पातंर्गत त्यांनी देशातल्या वन्यजीव संस्थांच्या विविध योजनांचा यावेळी आढावाही घेतला.

**<><><><><>**

देशाच्या संरक्षण उपकरणांपैकी ७५ टक्के खरेदी स्वदेशी कंपन्यांकडून करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे, असं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी सांगितलं. नवी दिल्लीत सुरु असलेल्या संरक्षण परिषदेत ते आज बोलत होते.

सरकारने २०२९ सालापर्यंत देशांतर्गत संरक्षण उत्पादन ३ लाख कोटी रुपयांपर्यंत नेण्याचं उद्दिष्ट ठेवलं आहे. देशांतर्गत संरक्षण उत्पादन २०१४ मध्ये चाळीस हजार कोटी रुपये होतं, ते वाढून आता १ लाख २७ हजार कोटी रुपयांच्याही पुढे गेलं आहे, असंही त्यांनी सांगितलं.

देशाची संरक्षण निर्यात २०१३-१४ मध्ये ६८६ कोटी रुपये होती ती आता वाढून २३ हजार कोटी रुपयांपर्यंत पोचल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरणानं आय आय टी - जे ई ई, नीट आणि इतर स्पर्धापरीक्षांचं प्रशिक्षण देणाऱ्या काही कोचिंग क्लासेसना विद्यार्थ्यांची दिशाभूल करणाऱ्या जाहिराती केल्याबद्दल नोटीस बजावली आहे. कोचिंग क्लासेसनी आपल्या जाहिरातींमध्ये परीक्षेत यशाची खात्री देणारी किंवा नोकरी मिळवून देण्याची आश्वासने देऊ नयेत, सर्व अटी आणि शर्ती ठळकपणे छापाव्यात आणि जाहिरातीत छापल्याप्रमाणे सर्व आश्वासनं पाळावीत अशा सूचना प्राधिकरणाने दिल्या आहेत.

**<><><><><>**

शेअर बाजारातल्या गुंतवणूकदारांनी संपत्ती निर्मितीचे दीर्घकालीन उद्दिष्ट ठेवावे. त्यासाठी माहितीपूर्ण आणि संयमाने निर्णय घ्यावा, असा सल्ला केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी दिला आहे. मुंबई शेअर बाजाराच्या दीडशेव्या स्थापना दिनानिमित्त मुंबईत झालेल्या कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

कंपन्यांनी पारदर्शकता, व्यवस्थापनात व्यावसायिकता ठेवावी, नियामकांनी तत्पर रहावं आणि बाजारांनी गुंतवणूकदार केंद्री सुधारणा कराव्या असं आवाहन

त्यांनी केलं. देशातल्या नागरिकांच्या वित्तीय सक्षमीकरणासाठी सरकार कटीबद्ध आहे. वित्तीय यंत्रणेच्या वृद्धीच्या प्रक्रियेत सर्वांना सहभागी होण्याची आणि विकासाची संधी दिली जाईल. त्यात उत्पन्न, राहण्याचे ठिकाण किंवा लिंग या आधारावर कुठलाही भेदभाव केला जाणार नसल्याची ग्वाही अर्थमंत्र्यांनी दिली. देशातल्या गुंतवणूकदारांचं सरासरी वय ३२ असून त्यातले ४० टक्के तिशीच्या आतले आहेत आणि एक चतुर्थांश महिला असल्याचं त्या म्हणाल्या. १ लाख कोटी पेक्षा अधिक बाजार भांडवल असलेली केवळ एक कंपनी २००० साली होती. कोरोनापूर्वी हे प्रमाण ३० होते आणि आता त्यांची संख्या ८१ पर्यंत वाढल्याची माहिती सीतारामन यांनी दिली. देशाच्या अर्थव्यवस्थेची मजबुती, सुधारणांची अंमलबजावणी आणि सातत्यानं वाढणारे गुंतवणूकदार यामुळेच हे शक्य झाल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

देशातले शेअर बाजार आजही जोरदार तेजी नोंदवून बंद झाली. सेन्सेक्स १ हजार ५०९ अंकांनी वधारुन ७८ हजार ५५३ अंकांवर विसावला. निफ्टी ४१४ अंकांची वाढ नोंदवून २३ हजार ८५२ अंकांवर बंद झाला. बँक निफ्टीही सुमारे पावणे बाराशे अंकांची वाढ नोंदवून ५४ हजार २९० वर बंद झाला. हा निर्देशांक उच्चांकी पातळीच्या अगदी जवळ आहे. सुरुवातीच्या सत्रात घसरणीत असलेले हे निर्देशांक बँकिंग समभागातल्या तेजींच्या बळावर वधारले.

<><><><><>

राज्यसेवा मुख्य परीक्षा २७ ते २९ मे दरम्यान घेण्याचा निर्णय MPSC नं घेतला आहे. या परीक्षा २६ ते २८ एप्रिल दरम्यान घेण्याचे नियोजन होते. मात्र तयारीला कमी वेळ मिळाल्याचे कारण देत काही उमेदवारांनी परीक्षा पुढे ढकलण्याची मागणी केली होती.

<><><><><>

बिहार विधानसभा निवडणुकीशी संबंधित विषयांवर चर्चा करुन ते मार्गी लावण्यासाठी समन्वय समिती स्थापन करण्याचा निर्णय राष्ट्रीय जनता दल आणि काँग्रेस प्रणित महाआघाडीनं घेतला आहे. महाआघाडीतल्या सहा घटक पक्षांची बैठक आज पाटणा इथं झाली. या बैठकीत हा निर्णय झाला. राष्ट्रीय जनता दलाचे नेते आणि माजी उपमुख्यमंत्री तेजस्वी प्रसाद यादव या समितीचे अध्यक्ष असतील. जागावाटप, प्रचारमोहिम, निवडणूक रणनीती यांच्याशी संबधित मुद्यांवर ही समिती निर्णय घेईल. समान किमान कार्यक्रमही ही समिती तयार करेल.

**<><><><><>**

पश्चिम बंगालमध्ये मालदा जिल्ह्यातल्या बीरनगर गावात झालेल्या बॉम्ब स्फोटात ५ मुलं जखमी झाली. त्यातल्या दोघांची प्रकृती गंभीर आहे. बंद असलेल्या एका घरात ते चेंडू सारख्या वस्तूनं खेळत होते. त्यावेळी हा स्फोट झाला, याप्रकरणाची पोलीस अधिक चौकशी करत आहेत.

**<><><><><>**

छत्तीसगड पोलिसांनी विविध ठिकाणांहून एकूण २२ नक्षलवाद्यांना अटक केली. यावेळी विविध स्फोटकं आणि इतर साहित्यही जप्त करण्यात आलं. बिजापूर, बेलचार, नेलनसार भागातून या नक्षलवाद्यांना पकडण्यात आलं.

**<><><><><>**

बँक घोटाळ्यातला आरोपी, हिरेव्यापारी मेहुल चोकसीच्या प्रत्यार्पणासाठी केंद्रसरकार बेल्जियमबरोबर चर्चा करत असल्याची माहिती परराष्ट्र व्यवहार विभागाचे सचिव रणधीर जयस्वाल यांनी दिली. नवी दिल्ली इथं आज ते पत्रकार परिषदेत बोलत होते. २६ - ११ च्या मुंबई हल्ल्याचा सूत्रधार तहव्वूर राणाचं प्रत्यार्पण हा पाकिस्तानसाठी खणखणीत संदेश आहे,  या हल्ल्यातल्या इतर

आरोपींना पाठीशी घालणं बंद करावं अशी समज पाकिस्तानला मिळाली आहे, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

भारतीय पुरातत्व सर्वेक्षण संस्थेने उद्याच्या जागतिक वारसा दिनानिमित्त देशभरातल्या सर्व पुरातत्व स्थानांना उद्याच्या दिवसभरासाठी मोफत प्रवेश देण्याचा निर्णय घेतला आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज मुंबईतल्या वानखेडे स्टेडियमवर मुंबई इंडियन्स आणि सनरायर्जस हैदराबाद यांच्यात सामना सुरु आहे. मुंबई इंडियन्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा सनरायर्जस हैदराबादच्या ८ षटकात १ बाद ६४ धावा झाल्या होत्या.

**//<><><><><>//**